# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक २६ जुलै, २०२३

## (सकाळी १०.३० ते ११.४५ वाजता)

**सन २०२३-२०२४ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा –**

**खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.**

१) मुख्यमंत्री

२) उप मुख्यमंत्री (गृह, विधी व न्याय, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, ऊर्जा)

३) उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन)

४) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री

५) सहकार मंत्री

६) महसूल,पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विकास मंत्री

७) वने,सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री

८) वैद्यकीय शिक्षण, विशेष सहाय्य मंत्री

९) उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य मंत्री

१०) आदिवासी विकास मंत्री

११) ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री

१२) पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री

१३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री

१४) मृद व जलसंधारण मंत्री

१५) कृषी मंत्री

१६) उद्योग मंत्री

१७) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री

१८) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री

१९) अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन मंत्री

२०) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री

२१) अन्न व औषध प्रशासन मंत्री

२२) गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री

२३) राज्य उत्पादन शुल्क मंत्री

२४) महिला व बालविकास मंत्री

अप्रकाशित प्रत

**२५)** क्रीडा व युवक कल्याण,बंदरे मंत्री

**२६)** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री

**२७)** मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

**(१) उच्च व तंत्र शिक्षण आणि संसदीय कार्य मंत्री :**

**(क)** "विधानपरिषदेच्या सन २०२३ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ ते दिनांक २५ मार्च, २०२३ या कालावधीत मा.मंत्री महोदयांनी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या एकूण ४०२ आश्वासनांची यादी तसेच, सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण १३५ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह" सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**(ख)** "यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे आणि अंतर्गत लेखा परिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(ड:)** "डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा

असुधारित प्रत

विद्यापीठ, औरंगाबाद यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(च)** "मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०१३-२०१४ ते सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(छ)** "स्पायसर ॲडवेनटिस्ट विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ज)** "फ्लेम विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१५-२०१६ ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(झ)** "संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ट)** "अजिंक्य डी.वाय.पाटील विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ठ)** "डॉ.विश्वनाथ कराड एमआयटी विश्वशांती विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१७-२०१८ ते सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ड)** "सोमय्या विद्यापीठ, मुंबई यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल"

असुधारित प्रत

सभागृहासमोर ठेवतील.

**(ढ)** "एमजीएम विद्यापीठ, औरंगाबाद यांचे सन २०१९-२०२० ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ण)** "डी.वाय.पाटील इंटरनॅशनल विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१८-२०१९ ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(त)** "सिम्बॉयोसिस स्किल ॲण्ड प्रोफेशनल विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१७-२०१८ ते २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(थ)** "महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, नागपूर यांचे सन २०१६-०१७ ते २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(द)** "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा सतरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ध)** "डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा पासष्टावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(न)** "स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णुपुरी, नांदेड यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(प)** "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर

अमुद्रित प्रत

विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(फ)** "संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ब)** "शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, कोल्हापूर यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकोणसाठावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(भ)** "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **मृद व जलसंधारण मंत्री** : "महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा बावीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(३) **बंदरे मंत्री** : "महाराष्ट्र सागरी मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे आणि स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास).**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने –**

(१) **श्री.आमश्या पाडवी, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ५** वर **उप मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

"मोलगी (ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार) येथील एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर झालेल्या बलात्काराची तक्रार नोंदवून चौकशी करण्याबाबत."

असुधारित प्रत

(२) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ४** वर **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** निवेदन करतील :-

"लोणेरे (जि.औरंगाबाद) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठाच्या परिक्षेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत."

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१)] —**

(१) **श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अंतर्गत सुरू असलेल्या व्यवस्थापन शास्त्र विभागाच्या परीक्षेत सलग सातव्या पेपरला विद्यार्थ्यांना जुनीच प्रश्नपत्रिका देण्यात आल्याची घटना दिनांक १० जून, २०२३ रोजी उघड होणे, दुसरा पेपर झाल्यानंतर ही चूक विद्यापीठाच्या लक्षात आणून देण्यात येणे, परंतु त्यानंतर ही चुकांची मालिका न थांबणे, या सर्व प्रकाराची नैतिक जबाबदारी स्वीकारुन कुलगुरू व परीक्षा नियंत्रकांनी आपल्या पदाचा राजीनामा देण्याची मागणी विविध विद्यार्थी संघटनांनी करणे, जुन्याच प्रश्नपत्रिका देण्याची चूक विद्यापीठामार्फत झाली असल्याने पुनर्परीक्षेचे परिपत्रक रद्द करून व्यवस्थापन अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यार्थ्यांना सरसकट पास करण्याची मागणी सुद्धा विद्यार्थी संघटनांनी करणे, परीक्षा पद्धतीमध्ये गंभीर चुका आढळून आल्याने विद्यापीठ प्रशासनाबरोबरच विद्यार्थ्यांचा वेळ श्रम व पैसा वाया जाणे, विद्यापीठ प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे, विद्यापीठ प्रशासनाच्या या गंभीर चुकीची शासनाकडून सखोल चौकशी होण्याची गरज तसेच याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०२३ व मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (२)] —**

(२) **श्री.अरुण लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सांगली जिल्हयात बनावट, भेसळयुक्त कृषी औषधांची विक्री राजरोसपणे सुरु असणे, यातून द्राक्ष उत्पादक, भाजीपाला उत्पादक तसेच सामान्य शेतकऱ्यांना लाखो रुपयांचा गंडा घालण्यात आल्याचे निदर्शनास येणे, बोगस आणि बनावटगिरीचा धंदा चालु असणे, अनेक ठिकाणी पॅकिंग मुंबई,

अप्रकाशित

बंगळूरचे आणि औषध मात्र स्थानिक अशा प्रकारे गैरप्रकार सुरु असणे, जिल्ह्यात वारणा टापूसह मिरज पश्चिम भाग, आटपाडी-जत तालुक्यांचा पश्चिम भाग, तासगाव, खानापूर, लेंगरे परिसर, वाळवा-शिराळा तालुक्यात मोठया प्रमाणात भाजीपिके लागवडीचे क्षेत्र असून या भागांतील अनेक शेतकऱ्यांना असा बनावट औषधांचा फटका बसल्याचे निदर्शनास येणे, शेतकऱ्यांची बोगस किटकनाशकांमधून फसवणूक मोठया प्रमाणात होत असून आर्थिक आणि पिकांचे असे दुहेरी नुकसान होत असणे, सबब सांगली जिल्हयासह राज्यातील शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व असुरक्षिततेची भावना, त्याबाबत शासनाने चौकशी करुन भेसळयुक्त शेती औषधांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करावी अशी शेतकरी वर्गाकडून होत असलेली मागणी, त्याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(३) **श्री.नरेंद्र दराडे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील निवृत्त शासकीय कर्मचारी, निमशासकीय कर्मचारी आणि शिक्षक यांना वेळवर निवृत्तीवेतन (पेन्शन) मिळत नसणे, दर महिन्याच्या १ तारखेला पेन्शन बँक खात्यात जमा होणे आवश्यक असताना अनेक वेळा २० ते २५ तारखेनंतर पेन्शन जमा होत असल्याचे निदर्शनास येणे, विशेषत: नाशिक जिल्ह्यातील अनेक पेन्शनधारकांच्या लोकप्रतिनिधींकडे तक्रारी प्राप्त होणे, परिणामी पेन्शनधारकांची होणारी आर्थिक कोंडी, पेन्शनधारक हे वयोवृध्द असल्यामुळे त्यांना आजारपणात औषधोपचार वेळेवर घेणे आवश्यक असतानाही पेन्शन वेळेवर होत नसल्यामुळे त्यांना औषधोपचारासाठी योग्य त्यावेळी पैसे उपलब्ध न होणे, परिणामी त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना व त्यांच्यात निर्माण झालेली वाढती असुरक्षितता, शासनाने यासंदर्भात तातडीने चौकशी करुन पेन्शनधारकांची आर्थिक कुचंबणा होऊ नये याकरीता दर महिन्याच्या १ तारखेला त्यांच्या बँक खात्यात पेन्शनची रक्कम जमा करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री.राजहंस सिंह वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथील दिंडोशी क्षेत्रातील काही झोपडीवासियांनी सन २००१ मध्ये वन खात्याच्या नियमानुसार सन १९९५ पूर्वीचे म्हणून ७ हजार रुपये भरले असून त्यांना चांदवली येथे घरे मिळालेली असणे, त्यानंतर अंदाजे १५ हजार रहिवाशांनी सन २००८ मध्ये नियमानुसार ७ हजार

अग्रिम प्रत

रुपये भरले, परंतु त्यांना १५ वर्षे होऊन सुद्धा त्यांना अद्यापपर्यंत घरे मिळाली नसणे, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात आंबेडकर नगर, गौतम नगर, सिद्धार्थ नगर, संजय नगर, कालीमाता नगर, आप्पापाडा, जामऋषी नगर, बंजारी पाडा, शांती नगर, पिंपरी पाडा, मातंग गड, सावित्रीबाई फुले नगर, क्रांती नगर, दामू नगर पासून मागाठाणे पर्यंत सदर जागा वन विभागामध्ये असणे, या उर्वरित झोपडीवासीयांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांचेही पुनर्वसन करावे, अशी मागणी केली असणे, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथील पात्र अंदाजे १५ हजार लोकसंख्येला, वन विभागाच्या जागेवर वास्तव्य करणाऱ्या लोकांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **सर्वश्री अनिकेत तटकरे,** सतिश चव्हाण, अमोल मिटकरी, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सांगली येथील वैद्य योगेश माहिमकर हे गेली १८-१९ वर्षे आयुर्वेदिक प्रॅक्टिस करीत असून अनेक रुग्णावर त्यांचेकडून औषधोपचार करण्यात येत असणे, त्यांनी केलेल्या एका प्रयोगात त्यांच्याकडे येत असलेल्या मधुमेहग्रस्त रुग्णांचे रक्त सांगलीमधील वेगवेगळ्या ४ नामांकीत लॅबमध्ये तपासणी साठी त्यांनी पाठविणे, त्यानंतर या चारही लॅबचे रिपोर्ट हे वेगवेगळे असल्याचे धक्कादायक प्रकार निदर्शनास येणे, एका लॅबमध्ये १२६ शुगर, दुसऱ्या लॅबने ३००, तिसऱ्या लॅबने ३९० व चौथ्या लॅबने ४२१ या सर्व लॅब जुन्या असून तज्ञ डॉक्टर येथे कार्यरत असणे, सदर चाचणीच्या रिपोर्टमधील तफावत पाहता नक्की कोणत्या लॅबबाबत रुग्णांमध्ये व त्यांचे नातेवाईकांमध्ये प्रश्नचिन्ह निर्माण झाले असणे, त्यामुळे लॅबमार्फत रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरु असून असेच रिपोर्ट येत राहिले आणि त्यावर रुग्ण औषधोपचार घेऊ लागले तर चांगले रुग्णही आजारी पडून त्यांच्या जीवावर बेतण्याची परिस्थिती निर्माण झाली असणे, यावर गंभीर दखल घेऊन शासनाने प्रामुख्याने तात्काळ या ४ लॅबची तसेच जिल्हयातील अन्य लॅबची चौकशी करुन त्यावर कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **सर्वश्री किरण सरनाईक,** विक्रम काळे, सत्यजीत तांबे, जयंत आसगावकर, सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात एक जानेवारी, २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू झालेला असणे, परंतु प्रत्यक्षात त्याचा लाभ सप्टेंबर, २००९ पासून

अप्रकाशित प्रत

डी.सी.पी.एस. /एन.पी.एस धारकांना मिळणे, तसेच सातवा वेतन आयोग जानेवारी, २०१६ पासून लागू करण्यात आलेला आहे परंतु, सातवा वेतन आयोग प्रत्यक्षात जानेवारी, २०१९ पासुन रोखीने लागू करण्यात आला आहे. तसेच १ जानेवारी २००६ ते सप्टेंबर २००९ पर्यंतच्या थकबाकीची रक्कम जीपीएफ धारकांना पाच समान हप्त्यांमध्ये त्यांच्या जीपीएफ खात्यामध्ये प्रत्यक्षरित्या देण्यात आलेली असणे व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ही थकबाकी रोख स्वरूपात मिळालेली असणे, २०१२ पर्यंत डी.सी.पी.एस. / एन.पी.एस. धारकांचे जी.पी.एफ., डी.सी.पी.एस., एन.पी.एस. असे कोणत्याही प्रकारचे खाते सुरू करण्यात आलेले नसणे, डी.सी.पी.एस / एन.पी.एस. खाते नसणाऱ्या कर्मचाऱ्यांना जी.पी.एफ. फरकाप्रमाणे सहाव्या व सातव्या वेतन आयोगाची थकबाकी मिळाली नसणे किंवा सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे प्रमाणे रोख स्वरूपात सुद्धा मिळाली नसणे, राज्यात डी.सी.पी.एस. / एन.पी.एस. / जी.पी.एफ. खाते नसणाऱ्या धारकांना सहाव्या व सातव्या वेतन आयोगाची थकबाकी तातडीने मिळण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **श्री.राजेश राठोड**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीमध्ये समावेश असलेला 'राजपूत भामटा' या जमातीतील 'भामटा'हा शब्द वगळण्यात येईल अशी घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १४ मे, २०२३ रोजी औरंगाबाद येथील जाहीर सभेत करण्यात येणे, सदर आश्वासनामुळे राजपूत भामटा, बंजारा, लमान, कैकाडी, मानस जोगी, माकडवाले, नंदीबैलवाले, अस्वलवाले, छप्पर बंद यासारख्या जमातीचे आरक्षण धोक्यात येण्याची शक्यता असून विमुक्त 'अ' गटातील आरक्षणावर अतिक्रमण असलेल्या तक्रारी शासनाकडे आले असणे, 'राजपूत भामटा' समाजाची लोकसंख्या राज्यात अत्यल्प असून राजपूत भामटा नसलेल्या अनेक व्यक्तींनी खोट्या प्रमाणपत्राच्या आधारावर आरक्षण मिळवण्याच्या तक्रारीबाबत तसेच भटके विभक्तीच्या अ आणि ब गटातील अत्यंत मागासलेल्या जमातींना संरक्षण देणे त्याच्या आरक्षणावरील अतिक्रमण थांबवणे आणि त्यांच्या शैक्षणिक आर्थिक विकासाचा कार्यक्रम आखणे या आणि अन्य मागण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केलेली नसणे, त्यामुळे या समाजाच्या लोकांमध्ये पसरलेला असंतोषाची भावना निर्माण होणे, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कारवाई व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

अप्रकाशित

**पाच : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

## - मध्यंतर -

**सहा : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

(१) **प्रा.राम शिंदे,** श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, **वि.प.स.** यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –

"अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड औद्योगिक वसाहतीची स्थापना सन १९९६ मध्ये झाली असणे, जामखेड औद्योगिक क्षेत्र भूखंड क्र.ए१ व ए२ असून क्षेत्रफळ १९.७२ हे.आर. असणे, तसेच कर्जत तालुक्यात औद्योगिक वसाहत सुरू करण्याबाबत तत्कालीन पालकमंत्री यांनी विशेष पुढाकार घेतलेला असणे, त्यासंदर्भात तत्कालीन उद्योगमंत्री यांच्या समवेत माहे एप्रिल, २०१६ मध्ये संबंधीत लोकप्रतिनिधींनी त्या कालखंडात बैठक घेवून व तद्संबंधी शासनाकडे पाठपुरावा केलेला असणे, कर्जत तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताला काम देण्यासाठी औद्योगिक वसाहत निर्माण करणे व त्या ठिकाणी उद्योग आणण्यासाठी प्रयत्न करणे, परंतु सन २०१९ ते सन २०२२ या कालावधीत सदर प्रस्तावास कोणतीही चालना तत्कालीन शासनाने दिली नसणे, जामखेड औद्योगिक वसाहतीत जमीन संपादन केल्यानंतर शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मावेजा दिला आहे किंवा कसे सद्य:स्थितीत जामखेड औद्योगिक वसाहतीमधील उद्योग आणण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही गेल्या २७ वर्षांपासून जामखेड येथील औद्योगिक वसाहत सुरू असताना त्या ठिकाणी कोणकोणते उद्योग सुरू आहेत, याबाबत शासनाने माहिती देण्याची आवश्यकता, तसेच सदर औद्योगिक वसाहतीमध्ये कोणकोणत्या गुंतवणूकदारांनी आपली गुंतवणूक नवीन उद्योग उभारण्यासाठी केली असल्याची संपूर्ण माहिती शासनाने देण्याची आवश्यकता, कर्जत व जामखेड हे तालुके जवळपास असून सुद्धा जामखेड येथील सुरू असलेल्या औद्योगिक वसाहतीत कोणतेही नवीन उद्योग आले नसणे, कर्जतमध्ये औद्योगिक वसाहत सुरू करण्यासाठी व या भागातील नव युवकांना रोजगार देण्याबाबत शासन कोणती भूमिका घेतलेली असणे, या नवीन औद्योगिक वसाहत मंजुरीबाबत सद्य:स्थिती काय आहे व नवीन औद्योगिक वसाहतीमध्ये उद्योग उभारण्यासाठी किती दिवसांचा कालावधी लागणार आहे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही."

(२) **श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे,** श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, **वि.प.स.** यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –

अग्रिम प्रत

"राज्यातील सर्व स्वयंअर्थसहाय्य शाळांना आर.टी.ई. प्रतिपूर्ती शुल्क अर्थसंकल्पामध्ये २०० कोटी रुपये मंजूर केले असणे व त्यापैकी प्रतिपूर्ती शुल्क म्हणून ८४ कोटी रुपये शासनाने दिले असून शासनाकडे त्यापैकी उर्वरित ११६ कोटी रुपये प्रलंबित असून राज्यातील अडचणीत व कर्जबाजारी शाळांना लवकरात लवकर हे देण्याची आवश्यकता, राज्यातील शाळा अडचणीत असणे, कर्जबाजारी असणे, तसेच कोरोना काळात सदर शाळांनी ऑनलाइन शिक्षण दिलेले असून तेव्हापासून राज्यातील ज्या स्वयंअर्थसहाय्य शाळांनी २५% विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेले असणे, प्रतिपूर्तीमध्ये शासनाकडून फक्त शिक्षण शुल्क दिले जात असणे, मात्र पालकांकडून गणवेश व शैक्षणिक साहित्यासाठी आग्रह धरला जात असणे, तसेच अधिकारी देखील शैक्षणिक साहित्य व अन्य गोष्टी संबंधीत विद्यार्थ्यांना द्यावे म्हणून सक्ती करीत असणे, शासनाकडून मिळणाऱ्या शैक्षणिक शुल्का व्यतिरिक्त गणवेश व शैक्षणिक साहित्यासाठी जादाचा लागणारा निधी उपलब्ध करून अशा शाळांना प्रलंबित प्रतिपूर्ती शुल्क लवकरात लवकर अदा करण्यात यावेत, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३)** **सर्वश्री श्रीकांत भारतीय,** प्रविण दरेकर, गोपिचंद पडळकर, **वि.प.स.** यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –

"समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट होण्यासाठी वयाची १८ वर्षे पूर्ण केलेले राज्यातील अनाथ युवक-युवती सर्वस्वी राज्य शासनाच्या धोरणावर अवलंबुन असणे, त्यानुषंगाने वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या राज्यातील अनाथ युवक-युवतींना पुढील महाविद्यालयीन व उच्च शिक्षण मोफत देण्याची तसेच त्यांच्या पुनर्वसन व रोजगार निर्मितीसाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना करण्याची आवश्यकता, तसेच अनाथ प्रमाणपत्र पडताळणीसाठी उच्च स्तरीय समिती स्थापन करणे, अनाथांकरिता असलेले आरक्षण हे फक्त शिक्षण आणि नोकरी पुरते मर्यादित न ठेवता शासनाच्या सर्व विभागातील कल्याणकारी योजनांमध्ये या आरक्षणाचा लाभ अनाथांना देण्याची आवश्यकता, तसेच राज्यस्तरीय अनाथ सल्लागार समिती तातडीने कार्यरत करणे, तसेच संजय गांधी निराधार योजनेचा लाभ बालगृहातील / अनाथालयातील बालकांना लागू करून त्यानुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संबंधित शासन निर्णयात नमूद अनाथांच्या तरतूदींमध्ये आवश्यक तो बदल करण्याची तसेच या योजनेच्या लाभाकरिता १५ वर्षाच्या रहिवासाची अट शिथिल करून त्याऐवजी अनाथ मुलांचा जन्म दाखला ग्राह्य धरण्याची आवश्यकता, तसेच संजय गांधी निराधार योजनेतून मिळणारी रक्कम बालगृहातील लाभार्थीच्या आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या संयुक्त बँक खात्यात ठेवून वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांस ती रक्कम व्याजासहित दिल्यास अनाथांना वयाच्या १८ व्या वर्षी रोजगारनिर्मितीसाठी बीज भांडवल

अप्रकाशित प्रत

मिळण्याची शक्यता, तसेच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात २५ बेडचे अनुरक्षणगृह स्थापन करणे, १८ वर्षानंतरच्या HIV बाधित अनाथ मुले/मुलींच्या पुनर्वसनासाठी महिला व बालविकास विभागांतर्गत कल्याणकारी योजना राबविण्याची आवश्यकता, तसेच सामाजिक न्याय विभागाची स्वाधार योजना अनाथ मुलांना लागू करून १८ वर्षानंतर उच्च शिक्षण आणि व्यवसायिक शिक्षण घेणाऱ्या अनाथ मुलांना प्रवासाकरिता मोफत पास सुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, तसेच १८ वर्षानंतरच्या अनाथ मुलांकरिता ग्रामीण व शहरी भागात घरकुल योजना राबविण्यासह म्हाडा आणि सिडकोमार्फत राबविण्यात येणाऱ्या सोडत प्रक्रियेमध्ये अनाथांकरिता सदनिका आणि व्यवसायासाठी गाळे राखीव ठेवण्याची आवश्यकता, तसेच शासनामार्फत राबवण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा केंद्रामध्ये अनाथ मुलांना राखीव जागा ठेवून धर्मादाय तसेच महात्मा फुले योजनेअंतर्गत अनाथ मुलांना रेशन कार्ड ऐवजी अनाथ प्रमाणपत्रावर उपचार देण्याची आवश्यकता, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत त्यांच्या उत्पन्नाचा एक टक्का निधी त्यांच्या क्षेत्रातील अनाथांसाठी राखीव ठेवण्यात आल्यास त्याद्वारे अनाथ मुलांचे अनेक प्रश्न निकाली लागण्याची शक्यता, तसेच अनाथ मुलांच्या शिक्षण, रोजगार तसेच इतर समस्यांबाबत दिनांक ११ फेब्रुवारी, २०२० तसेच दिनांक २१ ऑक्टोबर, २०२० रोजी वा सुमारास महिला व बालविकास विभागांतर्गत बैठकांचे आयोजन करण्यात येणे, तथापि सदरहू बैठकांमध्ये उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्न व समस्यांच्या निवारणाकरिता अद्यापपर्यंत शासनाकडून कोणतीच ठोस कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी राज्यातील अनाथ मुलांमध्ये शासनाप्रती निर्माण होत असलेली नकारात्मकतेची भावना, राज्यातील अनाथ युवक-युवतींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांच्या आयुष्यास योग्य ती दिशा दाखविण्याच्या दृष्टीकोनातून उपरोक्त नमूद प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबतची शासनाची नेमकी भूमिका."

अग्रिम प्रत

**सात : शासकीय विधेयके —**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(क)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, सचिन अहिर, एकनाथराव खडसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ख)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ — महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, सचिन अहिर, एकनाथराव खडसे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ — महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - नोंदणी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, सचिन अहिर, एकनाथराव खडसे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - नोंदणी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ — महाराष्ट्र वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरिता नुकसानभरपाई प्रदान करणे विधेयक, २०२३"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, सचिन अहिर, एकनाथराव खडसे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ — महाराष्ट्र वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरिता नुकसानभरपाई प्रदान करणे विधेयक, २०२३"विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही

अमुद्रित प्रत

सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ड:)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा, शिखर तक्रार निवारण समितीच्या नियमांचे व अधिसूचनेचे पुनर्अधिनियमितीकरण व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२३"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, सचिन अहिर, एकनाथराव खडसे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा, शिखर तक्रार निवारण समितीच्या नियमांचे व अधिसूचनेचे पुनर्अधिनियमितीकरण व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(च)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ – महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२३"

---

**आठ : (मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) –**

**सर्वश्री प्रविण दरेकर**, विजय ऊर्फ भाई गिरकर, अमोल मिटकरी, प्रसाद लाड, सतिश चव्हाण, विक्रम काळे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री निरंजन डावखरे, प्रविण दटके, अनिकेत तटकरे, सुरेश धस, गोपिचंद पडळकर, प्रविण पोटे-पाटील, चंद्रशेखर बावनकुळे, श्रीकांत भारतीय, रामदास आंबटकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, प्रा.राम शिंदे, सर्वश्री निलय नाईक, राजहंस सिंह, रामराव पाटील, रमेशदादा पाटील, वसंत खंडेलवाल, रमेश कराड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"राज्यात कायदा व सुव्यवस्था चोख ठेवण्याच्या दृष्टीने विद्यमान शासनाने सेफ्टीचे पर्सेप्शन तयार केले असणे, अनादी काळापासून प्रत्येक राज्य व्यवस्थेमध्ये गुन्हे

घडत असले तरी देशातील अन्य राज्यांच्या दृष्टीने आपला महाराष्ट्र गुन्हेगारी रोखण्यात आघाडीवर असल्याचे निदर्शनास येणे, गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी मागील वर्षभरात अनेक गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई केली असणे, २३९ लोकांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात येणे, अंमली पदार्थांच्या संदर्भात २०२२ मध्ये हजारो गुन्हे दाखल असून मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थ जप्त करण्यात येणे, खंडणीबाबत घडणारे गुन्हे मोठ्या प्रमाणात कमी झाले असणे, प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली अॅन्टी नार्कोटीक सेल तयार करण्यात आला असणे, शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात नार्कोटीकच्या संदर्भात शासनाने झिरो टोलरन्स पॉलीसी सुरु केली असणे, विद्यमान शासनाने २० हजार पोलीस भरतीची एकत्रित प्रक्रिया राबवून सर्व रिक्त पदे भरण्यासाठी पद भरतीचे निर्बंध शिथील केले असणे, पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक यांना वर्षाकाठी देय असलेल्या नैमितिक रजा १२ ऐवजी २० करण्याचा निर्णय घेतला असणे, पोलीसांना सवलतीच्या दरात गृह कर्जासाठी सन २०१७ ची लोकप्रिय योजना जी मागील शासनाने बंद केली होती ती पुन्हा लागू केली असणे, राज्यात ३४ फॉरेन्सिक लॅब तयार करण्यात आल्या असून टेक्निकल एव्हिडन्स हा ह्युमन एव्हिडन्सपेक्षा बोलका असल्याने व ह्युमन एव्हिडन्स होस्टाईल होऊ शकतो परंतु टेक्निकल एव्हिडन्स होस्टाईल होऊ शकत नाही ही वस्तुस्थिती विचारात घेता फॉरेन्सिक लॅब अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने शासनाकडून प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास येणे, राज्य पोलीस व मुंबई पोलीस यांनी ऑपरेशन मुस्कानच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे ३८ हजार बालकांना त्यांच्या घरी सुखरूप पोहचविल्याचे निदर्शनास येणे, देशात हरवलेली बालके व पळून आलेली बालके शोधून त्यांच्या घरापर्यंत पोचविण्याच्या कामात मुंबई व महाराष्ट्र पोलीसांचा प्रथम क्रमांक असल्याचे निदर्शनास येणे, राजकीय व सामाजिक आंदोलनातील गुन्ह्यांमध्ये जून २०२२ पर्यंत दोषारोपपत्र दाखल झालेले खटले मागे घेण्याचा निर्णय घेतला असणे, पोलीस दलातील शिपाई, पोलीस शिपाई, चालक, सशस्त्र पोलीस संवर्गातील विविध कारणास्तव रिक्त झालेली पदे तात्काळ भरण्यास शासनाने मान्यता दिली असणे, राज्यात गणपती व दहिहंडी उत्सवाच्या कालावधीत ज्या गुन्ह्यांमध्ये दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत दोषारोपपत्र दाखल झाले आहेत व ज्या खटल्यांमध्ये अटी-शर्तींची पुर्तता होते असे खटले मागे घेण्याची कार्यवाही सुरू असणे, कोरोना प्रतिबंधक आदेश लागू झाल्यानंतर या आदेशाचे उल्लंघन झाल्यामुळे दिनांक २१ मार्च, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत दाखल खटले मागे घेण्याची कायदेशीर कार्यवाही सुरू असणे, पोलीस कर्मचा-यांना पुरेशी निवासस्थाने उपलब्ध करून देण्यासाठी दिर्घकालीन, मध्यमकालीन व तात्काळ अशा तीन टप्प्यांवर उपाययोजना करण्याचा तसेच म्हाडाच्या मदतीने मुंबईतील पोलीस निवासस्थानांचा पुर्नविकास करण्याचा शासनाने निर्णय घेतला असणे, महिलांच्या संदर्भात वेगवेगळ्या जिल्ह्यात विशेष न्यायालये व जलद गती न्यायालये तयार करण्यात येणे, तसेच समुपदेशन केंद्रे स्थापन करण्यात येणे, बलात्काराच्या गुन्ह्यांबाबतीत ६० दिवसात चार्जशीट दाखल होण्याचे प्रमाण १८ टक्क्याहून वाढविण्यात पोलीस प्रशासानाला यश आल्याचे निदर्शनास येणे, राज्यात संवेदनशील असलेल्या

अग्रिम प्रत

नक्षलग्रस्त भागाकरिता शासनाने पुरेसा निधी उपलब्ध केलेला असणे, अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गाचे रक्षण करण्याच्या दृष्टीने शासन प्राथमिकता देत असल्याने त्यानुषंगाने कन्व्हीक्शनचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनाचे प्रयत्न असणे, राज्यातील संकटग्रस्त महिलांना तातडीने आवश्यक माहिती व मदत मिळण्यासाठी स्वतंत्र टोल फ्री क्रमांक १८१ महिला हेल्पलाईन सुरू केली असणे, राज्यात स्टीट क्राईम डिटेक्शनमध्ये गुणात्मक बदल करण्याच्या दृष्टीने कमांड ॲण्ड कंट्रोल सिस्टीम प्रकर्षाने राबविण्याचा व आणखी ६ हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला असणे, राज्यात गणपती व दहिहंडी उत्सव मोकळ्या वातावरणात पार पडावे या दृष्टीने शासनाने त्यावरील निर्बंध उठविले असणे, पंढरपूरला जाणा-या वारक-यांना टोलमाफी केली असणे, गणेशमुर्तीच्या उंचीवरील निर्बंध उठविले असणे, गणेशोत्सवाला कोणतेही शासकीय शुल्क भरावे लागू नये याची दक्षता घेतली असणे, ज्येष्ठ नागरिकांना लुबाडणे, एकाकी राहणाऱ्या ज्येष्ठ दांपत्यांना संरक्षण इत्यादी बाबतीत शासनाने कडक धोरण राबविल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांसंबंधीच्या गुन्ह्यांत कपात झाली असणे, शासनाने मागील वर्षभरात न्यायव्यवस्था बळकट करण्याच्या दृष्टीने प्रत्येक स्तरावर न्यायालयांची स्थापना करणे व न्यायालयांसाठी नवीन पदे निर्माण करण्याचे धोरण स्वीकारले असणे, राज्यातील कारागृह क्षमतेपेक्षा कैद्यांची संख्या अधिक झाल्याने राज्यात वेगवेगळ्या जिल्ह्यात नवीन कारागृहे बांधण्याची कार्यवाही सुरु असणे, कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत कठोर उपाययोजना करण्याबाबत शासनाने घेतलेल्या विविध निर्णयांमुळे राज्यातील महिला, बालके, उपेक्षित वंचित घटक व ज्येष्ठ नागरिक चिंतामुक्त व मोकळ्या वातावरणात राहत असल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक प्रखर करण्याच्या दृष्टीने सर्वंकष विचार विनिमयातून नव-नवे उपक्रम राबविण्याची व त्यायोगे राज्य पोलीस दल अधिक सक्षम करण्याची आवश्यकता व त्याबाबत करावयाची उपाययोजना."

**नऊ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

**(१) सर्वश्री गोपिचंद पडळकर,** प्रवीण दटके, रमेश कराड, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"विटा (जि. सांगली) पोलिसांनी खोटा गुन्हा दाखल करून दोन किलो सोने हडप केल्याची घटना माहे एप्रिल, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी विटा पोलीस ठाण्याचे अधिकारी व सुरज मुल्ला यांनी संगनमत करून सागर जगदाळे यांच्यावर बोगस गुन्हा दाखल करून दोन किलो सोने हडप केल्याची तक्रार खुद्द तक्रारदार सागर जगदाळे यांनी केलेली असणे, यासंदर्भातील सर्व पुरावे देखील तक्रारदारांनी उपविभागीय पोलीस अधिकारी यांना दिलेले असणे, तसेच दिनांक १२ मे, २०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मा. पालकमंत्री, सांगली व मा. विधानपरिषद सदस्यांनी सदर प्रश्न उपस्थित केला असता मा. पोलीस अधीक्षक, सांगली यांनी

याबाबतचा तपास अंतिम टप्प्यात असल्याचे सांगत आठ दिवसांत कारवाई करण्याचे आश्वासन देऊनही आजमितीस दोषींवर कारवाई झालेली नसणे, त्यामुळे नागरिकांमध्ये पोलीस खात्याबाबत निर्माण झालेला संभ्रम याबाबत शासनाने तात्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता असून याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री रामदास आंबटकर,** प्रविण पोटे-पाटील, रमेश पाटील**, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"गडचिरोली जिल्हा हा आदिवासी बहुल व नक्षलग्रस्त् भाग असून जिल्हयात जवळपास १९८ कुटुंबांतील प्रमुख व्यक्तींची खबऱ्या म्हणून नक्षलवादयांनी केलेली हत्या, जिल्हयात मागील ३५-३६ वर्षांपासून नक्षलवाद्यांच्या शासनाविरुध्द् सशस्त्र व हिंसक घटना सुरु असणे तसेच पोलिसांना होणाऱ्या कारवायांबाबतची माहिती खबऱ्याकडून पुरविली जात असल्याच्या संशयावरुन सदर १९८ आदिवासी कुटुंबांतील व्यक्तींची क्रूरपणे झालेली हत्या, त्याबाबत मा.पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांचेकडून नक्षलपिडीत असल्याचा दिलेला दाखला, त्यामुळे गडचिरोली या नक्षलग्रस्त् जिल्हयातील नक्षलवाद्यांनी हत्या केलेल्या गोपनीय बातमीदारांच्या कुटुंबांतील एका व्यक्तीस शासन सेवेत सामावून घेण्याबाबत दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी शासनाने निर्गमीत केलेला शासन निर्णय, परंतु वास्तविकता सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येणे, त्यामुळे जिल्हयातील एटापल्ली, धानोरा, कोरची, सिरोंचा, भामरागड, अहेरी या आदिवासी बहुल व नक्षलग्रस्त् भागातील नक्षलपिडीत कुटुंबातील सदस्यांना नोकरीवर सामावून न घेतले गेल्याने जवळपास १०८ कुटुंबांतील सदस्यांची शैक्षणिक पात्रता असूनही त्यांना वंचित ठेवले जाणे, तर कित्येकांची वयोमर्यादा ओलांडल्या जाणे याबाबत मा.जिल्हाधिकारी गडचिरोली, मा. मुख्य कार्यपालन अधिकारी, मा. पोलीस अधीक्षक यांना पिडीत कुटुंबाकडून वारंवार लेखी निवेदन देऊनही सदर नक्षलपिडीत कुटुंबाना न्याय न मिळणे, त्यामूळे शासनाने शासन निर्णय निर्गमीत करूनही अंमलबजावणी होत नसल्यामूळे पिडीत कुटूंबामध्ये निर्माण होणारा असंतोष, शासनाने नक्षलपिडीत कुटुंबांतील एका व्यक्तीला शासन सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही".

अप्रकाशित प्रत

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २५ जुलै, २०२३

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद